शिल्पकार विकासाचा...

देशदूत

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.com

27 Dec 2024 - Page 9

# हॅकॅथॉन स्पर्धेत के.के. वाघ अव्वल



**नाशिक ।** भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयातर्फे नुकत्याच घेण्यात आलेल्या स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन - २०२४ स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर या दोन्ही प्रकारात उल्लेखनीय यश संपादन करत देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. यावेळी तीन संघांना एकूण तीन लाख रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाने विजयासह बक्षीसांची हॅट्रिक केली. हर्ष लुकारे, प्रिती राठी, सायली उगलमुगले, किशन माळी, तन्मय तांबट, प्रद्युम्न पाटील, पर्णिका पाटील, हर्षल पाटील, पंकज मराठे, प्रतीक चंद्रात्रे, आदित्य देवळालीकर, अथर्व गाडेकर, ओसिनिया क्षेत्रियम, अक्षदा खैरनार, मेघराज भावसार, श्रेय साळुंखे, ईशान जावळे, प्रणव प्रजापती यांनी प्रथम पारितोषिक पटकावले विद्यार्थ्यांना श्वेता जाधव व प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, संगणक विभागप्रमुख डॉ. एस एम कमलापूर, प्रा. डॉ. आर. के. मुंजे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.